जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०९/२०२३
## दि.२०/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी-काळभोर पो स्टे ५९२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक विवाहित महिला,वय-२३ वर्षे,रा.मु.पो.वळती,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | फिर्यादीचे पती व त्याचे एक नातेवाईक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी दुपारी १४/०० वा.वळती,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती नमुद इसम याने फिर्यादी यांचे चारिञ्यावर संशय घेवुन,तीस दारु पिवुन लाथा-बुक्याने मारहाण करीत होता. त्यानंतर दिनांक १२/०९/२०२३ रोजी १४/०० वा. त्याने त्याचे घराचा दरवाजा बंद करुन मारहाण करून,तु घरात राहयचे नाही,बाहेर जावुन जीव दे असे म्हणाला. त्यावेळी फिर्यादी हे त्याचे मारहाणीपासुन वाचण्याकरीता व त्याला भिती दाखविण्याकरीता तीचे घरामध्ये असलेल्या शेतीच्या पंपातील पेट्रोल अंगावर ओतुन घेतले,परंतु त्याचवेळी फिर्यादी यांचे पती याने फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने तीचे अंगावर कोडे पेटीने आग लावुन,त्यामध्ये फिर्यादी हिचे गळयास,छातीस तोंडास भाजुन त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फिर्यादी यांचे नातेवाईक हिने झाला प्रकार कोठे सांगु नये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून दमदाटी केली |
| **त.अंमलदार** | सहायक पोलीस निरिक्षक, शिवशांत खोसे ९८८१३१३३५३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे २८८/२०२३,भादविक ३२३,५०४,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,महा. पो.का.क. ३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | राजेश देवेंद्र,वय-३५,रा.चाळ क्र १२४/९,शिवदर्शन,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम इतर ४ ते ५ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०९/२०२३ २२.३०वा.सिध्दीविनायक मसाले किराणा दुकान समोरील मुख्य रस्त्यावर शिवदर्शन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद तीन इसम हे फिर्यादी यांचे ओळखीचे असुन,फिर्यादी हे त्यांचे घरा जवळील बेकरी मध्ये जात असताना,यातील नमुद इसम व त्याचे इतर साथीदार यांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,जुन्या भांडणाचा राग मनात धरुन,फिर्यादीस शिवीगाळ व लाथा-बुक्यानी मारहाण करुन,त्याचे कमरेला असलेला कोयता बाहेर काढुन,फिर्यादीस मारण्यासाठी उगारला असता फिर्यादी हे पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कामठे ९९२२९७०९७२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १२२१/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-४२ वर्षे,रा.स.नं.३७,काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०९/२०२३ रोजी १८/३० वा.मंत्री मार्केट समोर,हडपसर,गाडीतळ,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गणपतीची मुर्ती पाहणेसाठी नमुद ठिकाणी गेले असताना,चार अनोळखी इसमांनी संगनमत करुन,फिर्यादीस एका इसमाने धक्का देवुन,त्याचे इतर साथीदारांनी त्यांचेशी वाद घालुन,त्यांना धक्का-बुक्की करुन,फिर्यादी यांचे खिशातील मोबाईल फोन १०,०००/- रू किचा जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, चेतन थोरबोले ८७६७३७००६२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १९६/२०२३,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | महेश मोहिते,वय-२५ वर्षे,रा.सासवड,ता.पुरंदर,जि.पुणे |
| **आरोपीत** | १.फिर्यादीचे पती व त्याचे एक नातेवाईक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०५/२०२३ ते दि.१७/०९/२०२३ रोजीचे कालावधीत ओटा नं.३४९,बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण सौ.गौरी चेतन सोनवणे,वय-१९ वर्षे,रा.ओटा नं.३४९,बिबवेवाडी, पुणे हिचे लग्न तीचा पती आ.क्र.१ याचेबरोबर दि.२९/०५/२०२३ रोजी होवुन,ती मुलांसह सासरी नांदत असताना,तीचा पती आ.क्र.१ याने दारू पिवुन येवुन,गौरी हिस शिवीगाळ व मारहाण करून,तीची सासु हिने वारंवार विनाकारण त्रास देवुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून, सौ.गौरी हिस तीचे राहते घरी दि.१७/०९/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा.चे पुर्वी राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नरेंद्र शिंदे ०२०/२४२८२००३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १४२४/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२४ वर्षे,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी पहाटे ०१/२० वा.ते ०२/१५ वा.चे दरम्यान मॅजेस्टीक नेस्ट सोसायटी समोरील मोकळया जागे समोर नाल्याचे बाजूला फुरसुंगी गाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नामांकीत ऑनलाइन फुड डिलीव्हरी कंपनी मध्ये पार्ट टाईम डिलीव्हरी बॉय म्हणुन काम करतात. फिर्यादी यांना रात्री १२/५० वा.साडेसतरा नळी,हडपसर,पुणे येथुन फुरसुंगी गाव बस स्टॉप येथील ऑनलाईन जेवणाची ऑर्डर आल्याने,फिर्यादी यांनी ती ऑर्डर ताब्यात घेवुन,त्यांना ऑर्डरचे आलेल्या लोकेशननुसार ऑर्डर घेवुन,त्या लोकेशनवर अंदाजे ०१/२० वा.गेले असताना,त्याठिकाणी यातील नमुद इसमांनी संगनमत करून,ऑर्डर का उशीरा आली,तुला पैसे देणार नाही असे बोलून,त्यांनी मागविलेले जेवनाची ऑर्डर घेवुन,फिर्यादीस ऑर्डरचे पैसे न देता,त्यांचे खिशातील ५,२००/- रुपये रोख रक्कम तसेच ५,०००/- रुपये किचा एक मोबाईल हॅण्डसेट जबरदस्तीने काढुन घेवुन,फिर्यादीचे मोबाईलवरुन एकुण २,८८०/- रुपये ऑनलाईन कोणाचेतरी युपीआयवर ट्रान्सफर करुन घेवुन,फिर्यादी यांचेकडील एकुण ११,०८०/- रुपये किचा ऐवज जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुशिल डमरे ८८८८८२७४२४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**